13 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहारदार संवादिनी शास्त्रीय गायनाने संगीत रजनीची सांगता

## बहारदार संवादिनीबाबत जुगलबंदी व शास्त्रीय गायनाने रसिक मंत्रमुग्ध : मान्यवरांची उपस्थिती

**जनप्रवास : कोल्हापूर**

संगीत व नाट्यशास्त्त अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीच्या पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सुद्धा रसिकांनी व संगीतप्रेमीनी गर्दी केली.

दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्राची सुरुवात डॉ. सुधांशु कुलकर्णी व सारंग कुलकर्णी, बेळगाव या पितापुत्रांनी आपल्या बहारदार संवादिनी वादनाने मैफिलीता रंग चढविला. त्यांनी संवादिनीवर राग गावतीमध्ये विलंबित एकमाल तसेच हुन तीन तालातील बंदिशी सादर केल्या. यानंतर राग श्रीमधील ताल रुपकममधील बंदिश सादर केली. यानंतर 'दे हाता शरणागता है नाट्यगीत सादर करुन 'माझे माहेर पंढरी या अभंगाने आपल्या जुगलबंदीची सांगता केली. त्यांना तबल्याची अतिशय रंजक साधसंगत



कोल्हापूर : डॉ. सुधांशु कुलकर्णी व सारंग कुलकर्णी, बेळगाव या पितापुत्रांनी आपल्या बहारदार संवादिनी वादनाने मैफिलीता रंग चढविला.

गिरीधर कुलकर्णी, कोल्हापूर यांनी केली. संवादिनीवरील गायकी अंगाने फिरणाऱ्या बोटांची जादू व रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे अतिशय रंजक जुगलबंदी झाली.

दुसऱ्या सत्रामध्ये प्रसिद्ध शास्त्रीय गायक व पं. विजय कोपरकर, पुणे यांचे शास्त्रीय गायन झाले. ग्वाल्हेर घराण्याची शिस्त तसेच पं. वसंतराव देशपांडे व पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या गायकीचा सुगंध यामुळे राजर्षी शाहू संगीत रजनीच्या समारोपाच्या सत्रामध्ये कोपरकर यांनी आपल्या अवीट गोडीच्या गायनाचा आनंद रसिकांना दिला उत्तम व सौंदर्यपूर्ण सरगम, सरळ, लिलया फिरणारी तान व गळा राग शुद्धता हे पं. विजय कोपरकर यांच्या गायकीची विशेषतः होती. त्यांनी आपल्या कार्यक्रमाची सुरुवात जोग या रागाने केली. राग भैरवी रागातील दादरा तालातील रचना गाऊन आपल्या मैफलीच्या त्यांनी समारोप केला.

संगीत व नाट्यशास्त्त अधिविभागाचे प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी कलाकारांचे स्वागत व आभार मानले. या दोन्ही दिवसाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन मनीष आपटे यांनी केले तर ध्वनिव्यवस्था रमेश सुतार यांनी सांभाळली. या रंगलेल्या संगीत मैफिलीसाठी कोल्हापुरातील पं. अरुण कुलकर्णी, पं. सुधीर पोटे, डॉ. ज. ल. नागावकर, नंदकुमार जोशी, विनोदकुमार लोहिया, डॉ. शीतल धर्माधिकारी, केदार वैशंपायन आदी संगीतक्षेत्रातील रसिक उपस्थित होते.

13 FEB 2026
पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय विवेकानंद महोत्सवाचे १६ फेब्रुवारीपासून आयोजन

कोल्हापूर : विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने १६ व १७ फेब्रुवारी दरम्यान 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा' या राष्ट्रीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उपक्रमामध्ये पहिल्या दिवसी अभिवाचन, आयडीयाथॉन, रील फ्लिक्स, डान्स मॅजिक स्पर्धा होणार आहेत. स्पर्धांसाठी रोख पारितोषिके विजेत्यांना मिळणार आहेत. दुसऱ्या दिवसी दि. १७ फेब्रुवारी रोजी विवेकानंद कॉलेजमधील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी मिस्टर अॅण्ड मिस विवेकानंद स्पर्धा होईल. तसेच, आजी-माजी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कलाकौशल्यास वाव देण्यासाठी स्टुडंटस् एक्स्पो होणार आहे. विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आय.क्यु.ए.सी. व महोत्स्वाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले आहे.

13 FEB 2026
सकाळ

# आंतरविद्याशाखीय संशोधन कृषी विकासासाठी आवश्यक

## डॉ. ज्योती जाधव : विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १२ : शाश्वत कृषी विकासासाठी हवामान, पर्यावरण आणि संख्याशास्त्र या विविध विद्याशाखांमध्ये संतुलित समन्वय महत्त्वाचा आहे. पर्यावरणीय समतोल आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आंतरविद्याशाखीय संशोधनाची नितांत आवश्यकता आहे. सांख्यिकी, जीवनविज्ञान, पर्यावरणशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समन्वय भविष्यातील संशोधन कार्यामध्ये अतिशय मोलाची भूमिका बजावणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्राने दिवंगत डॉ. सुलोचना गाडगीळ आणि डॉ. माधव गाडगीळ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ घेतलेल्या 'शाश्वत कृषीसाठी हवामान, पर्यावरण व सांख्यिकी' या पीएम-उषा पुरस्कृत कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी सोमवारी त्या बोलत होत्या.

कार्यशाळेचे संसाधन व्यक्ती डॉ. अनिल गोरे यांनी हवामानविषयक माहिती, पर्जन्यमानाचे विश्लेषण आणि कीड-रोग नियंत्रणासाठी सांख्यिकी पद्धतींचा उपयोग यावर मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील पावसावर अवलंबून शेती, पिकांवरील कीड व बुरशीजन्य रोग, तसेच रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी डेटा-आधारित निर्णय प्रणाली या विषयांवर कार्यशाळेत चर्चा झाली.

संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक, सोमनाथ पवार, सुकुमार राजगुरू, सचिन पाटील यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

13 FEB 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात शनिवारी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

कोल्हापूर,: शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे शनिवार, १४ रोजी आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत उपाय या विषयावरील



आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. झेक रिपब्लिक येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. इंद्रजित घोष यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी दिली आहे. अधिविभागातर्फे आयोजित एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत रसायनशास्त्रावर आधारित उपायांद्वारे शाश्वत विकास, ऊर्जा आणि पर्यावरणातील जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी विचारमंथन करण्यात येणार आहे. परिषदेत स्ट्रक्चरल इनऑर्गेनिक, ऑर्गेनो-मेटॅलिक आणि मटेरियल्समधील अत्याधुनिक संशोधनावर प्रकाश टाकण्यात येईल. उत्प्रेरक हरित रसायनशास्त्र आणि आयोनिक द्रव पदार्थांच्या निर्मितीच्या अनुषंगानेही चर्चा होईल. परिषदेत प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी, मुंबई, डॉ. दिनेश सावंत, एनसीएल, पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन, आयआयटी, मंडी आदी शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेचे समन्वयक म्हणून डॉ. संजय कोळेकर काम पाहत असून प्रा. हंगीगेकर, प्रा. राशिनकर हे विविध समित्यांचे प्रमुख आहेत. परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. कल्याणराव गरडकर आहेत. डॉ. सपताळ, डॉ. दगडे, डॉ. संकपाळ यांच्यासह कार्यकारिणी परिश्रम घेत आहे. परिषदेत सुमारे ३५० पेक्षा अधिक देशविदेशांतील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी होणार असून दोनशेहून अधिक शोधनिबंध सादर करण्यात येतील.

1 3 FEB 2026
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राचार्य शिवाजीराव भोसले तत्त्वज्ञानाचा मानवी अर्थ उलगडणारे विचारवंत : कुंभार

**कोल्हापूर :** प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी महाराष्ट्राच्या बौद्धिक व सांस्कृतिक जीवनाला आपल्या विचारांनी समृद्ध केले. ते मानवी जीवनाचा अर्थ उलगडणारे थोर विचारवंत होते, असे प्रतिपादन डॉ. नागोराव कुंभार यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे आयोजित प्राचार्य शिवाजीराव भोसले व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. नागोराव कुंभार म्हणाले, प्राचार्य भोसले यांनी तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, कुलगुरू आणि प्रभावी वक्ते म्हणून त्यांनी वैचारिक क्षेत्रात स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवला. अतिशय अवघड विषय सोप्या आणि सप्रमाण भाषेत मांडण्याची त्यांच्याकडे विलक्षण क्षमता होती. त्यांच्या विचारांची भाषा ओघवती, तर मांडणीचा आवाका व्यापक होता. शिक्षणातून माणसाला जीवनदृष्टी प्राप्त झाली पाहिजे, असा त्यांचा ठाम आग्रह होता. महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण परंपरेचा वारसा त्यांनी समर्थपणे पुढे नेला. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा त्यांच्या चिंतनावर प्रभाव होता. अध्यक्षीय मनोगतात डॉ. प्रकाश पवार म्हणाले, प्राचार्य भोसले यांच्या विचारांचा आवाका अत्यंत व्यापक होता. जनसामान्यांमध्ये शिक्षणाविषयी आकर्षण निर्माण करण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार त्यांनी समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचवले. वक्तृत्व ही एक स्वतंत्र साधना आहे, याची जाणीव करून देत त्यांनी ग्रामीण व शहरी महाराष्ट्रात प्रबोधनाची परंपरा रुजवली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले. आभार डॉ. दत्तात्रय मचाले यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अरुण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

13 FEB 2026
सकाळ

# डॉ. शरद बनसोडे 'एआययू ऑब्झर्व्हर'


डॉ. शरद बनसोडे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धेसाठी 'एआययू ऑब्झर्व्हर' म्हणून निवड करण्यात आली आहे. बंगळूर येथील जैन विद्यापीठात १४ फेब्रुवारीपर्यंत ही स्पर्धा होत आहे. अखिल भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) नवी दिल्लीतर्फे ही निवड करण्यात आली आहे. बनसोडे यांचा बास्केटबॉल विषयावर सखोल अभ्यास असून, त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर योगदान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूरसह राज्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू मिळाले आहेत.